# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक:—

क्र.वि.नि.वि./३००/०२/२०१५
मुंबई — ४०० ०३२,
४ जूलै, २०१५,

प्रति ,

१) विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख.
२) प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये तसेच सर्व संलग्नित विज्ञान संस्था.

विषय : —विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४—२०१५) प्रदान करणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येत आहे की, श्रीमती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या कालखंडात समाजामध्ये स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून केलेल्या संस्मरणीय कार्याबद्दल व त्यांच्या स्मृतीपित्यर्थ मुंबई विद्यापीठातर्फे सन २००३—२००४ सालापासून विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणा—या विद्यापीठ विभागातील/महाविद्यालयांतील शिक्षिका **(एक शहरी व एक ग्रामीण)** अशा एकूण दोन आदर्श शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्रदान करून गौरव करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्या अनुषंगाने सन २०१४—२०१५ करिता सदर पुरस्कारासाठी पात्र शिक्षिकांची निवड करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती गठीत करण्यात येणार आहे. विद्यापीठातर्फे निवड होणा—या पुरस्कारप्राप्त शिक्षिकांना प्रत्येकी रूपये १०,०००/— (रूपये दहा हजार फक्त) रोख व त्यासोबत मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस असे कळविण्यात येत आहे की, विद्यापीठाचे विविध विभाग/महाविद्यालयीन स्तरावर किमान **<u>१५ वर्षे</u>** सलग स्थायी सेवा झालेल्या व विशेष गुणवत्ता, अर्हता प्राप्त केलेल्या आणि अनुभव असलेल्या पात्र शिक्षिकांचे आपणांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव विद्यापीठाने गठीत केलेल्या निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थामध्ये क्रियाशिल सहभाग व उल्लेखनीय कामगिरी, व्यक्तिगत स्तरावर केलेल्या कार्याबाबतचे विश्वासार्ह अहवाल, स्त्रियांच्या प्रश्नावर केलेले अभ्यासपूर्ण संशोधन व उल्लेखनीय लेखन, आर्थिक स्तरावर स्त्रियांना सक्षम करण्यासाठी केलेले प्रयत्न, स्वयंरोजगार, प्रशिक्षण, अंगणवाडी, हुंडा निर्मुलन, स्त्री—पुरूष समानता, स्त्री शोषण, जातियता निर्मुलन, सर्वधर्मसमभाव अशा उपक्रमांमध्ये क्रियाशिल सहभाग अशा गोष्टी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

..२/—

समितीपुढे विचारार्थ ठेवण्यासाठी आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त दोन पात्र शिक्षिकांचे स्वंयपुर्ण प्रस्ताव (४ प्रतित) त्यांच्या स्वाक्षरीनिशी सोबत जोडलेल्या 'अ', 'ब' आणि 'क' या विवरण पत्रासोबत माहिती भरून आपल्या शिफारशीसह सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, कक्ष क्र. १३२, पहिला मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. यांच्याकडे दिनांक ३१ जुलै २०१५ पर्यत पाठवून द्यावेत. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच अपु—या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी.

आपणांस असेही कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराच्या प्रस्तावाबाबत सुचक व अनुमोदक अशा दोन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील स्थायी सेवेत असलेल्या शिक्षक कर्मचा—यांच्या स्वाक्ष—या असणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे अर्जदाराने प्रपत्रातील विहित रकान्यात आपल्या स्वतःच्या प्रस्तावास संमती असल्याचे जाहीर करणे आवश्यक राहील.

श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार हया अगोदर ज्यांना मिळालेले आहेत त्यांच्या नावान्ची शिफारस करण्यात येऊ नये.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व संबधित शिक्षिकांच्या निदर्शनास आणून द्यावे. याबाबत सविस्तर माहिती तसेच 'अ' 'ब' आणि 'क' विवरण पत्र विद्यापीठ संकेतस्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.

स्थळ :– मुंबई – ४०० ०३२
दिनांक :– ४ जुलै २०१५

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)

---

पुरस्काराकरीता प्राथमिक अटी :– खालील अटी पूर्ण करणारे शिक्षिका "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराकरिता" अर्ज करण्यास/प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

१. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेले शिक्षिका तसेच विद्यापीठाची मान्यता प्रत जोडणे आवश्यक राहिल.
२ शिक्षिकांनी नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले/प्रतिनियुक्तीवर आहेत अशा शिक्षिका पुरस्कारासाठी अपात्र राहतील.
३ शिक्षकांनी कमीत कमी १५ वर्षाची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य देतील.
४ "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्राप्त शिक्षिका, पुनःश्च अशा पुरस्काराठी पात्र राहणार नाहीत.
५ शिक्षकाविरूध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
६ शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
७ संबंधित महाविद्यालयांचे मुल्यांकन (Re-Accreditation) अनिवार्य राहील.
८ **मुंबई विद्यापीठ विभागाचे संचालक/विभागपमुख यांनी आपले प्रस्ताव मा. कुलसचिव यांच्या शिफारशीसह सदर करण्यात यावे व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी आपले प्रस्ताव अध्यक्ष/सेक्रेटरी यांच्यामार्फत पाठविण्यात यावेत, अन्यथा या विभागास प्राप्त झालेले प्रस्ताव निवड समितीपुढे सादर केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

## प्रपत्र 'अ'

सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४–२०१५)

१) शिक्षिकेच सपूर्ण नाव :

२) पत्ता व दूरध्वनी क्रमांक (निवास) :

३) सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे / विद्यापीठ विभागाचे नाव व पत्ता :

४) धारण केलेले पद (स्थायी) :

५) अध्यापनाचा अनुभव :

६) शैक्षणिक अर्हता :

७) प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकाचे सपूर्ण नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

८) सूचकाचे महाविद्यालय / विद्यापीठ नाव व पत्ता व मोहर :

प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी

९) प्रस्तावास अनुमोदन देणा–या शिक्षकाचे नाव पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

१०) अनुमोदकाचे महाविद्यालय / विद्यापीठ विभागाचे नाव, पत्ता व मोहर :

प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी

मी खाली सही करणार श्रीमती / कुमारी ------------------------------

असे जाहीर करते की उपरोक्त माहिती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :

शिक्षिकेंची स्वाक्षरी

श्रीमती / कुमारी ..............................हया आमच्या विभागात ..............................
या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो / करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर प्रस्तावासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी

विभागाचे संचालक / विभाग प्रमुख
महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी / शिक्का

## प्रपत्र – 'ब'

### सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१४–२०१५) गुणतक्ता

| क्र. | पी.एच.डी. किंवा नेट सेट उत्तीर्ण झालेले असल्यास | ग्रंथ/लेखन इत्यादी (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) प्रति सादर कराव्यात | सहशैक्षणिक उपक्रमातील सह सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान इत्यादी बाबत सहभाग प्रति सादर कराव्यात | सामाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्रीशोषणाविरूध्द जाणीव आणि जागृती, स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इत्यादी बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/ बक्षिसे | थोडक्यात परिचय स्वतंत्र परिशिष्ट जोडावे (प्राचार्यांनी प्रमाणित केलेले असावे) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

दिनांक :

ठिकाण :

विद्यापीठाच्या विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे
प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहेर/शिक्का

# प्रपत्र 'क'

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती/कुमारी ..........................................................................

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम – प्राध्यापक/ अधिव्याख्याता/प्रपाठक ..........................................

यांचा गतोतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही चालू नाही.

ठिकाण :–

दिनांक :–

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी/शिक्का